अतिरिक्त महापालिका आयुक्त कार्यालय (ज),
पुणे महानगरपालिका.
जावक क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/२८७५
दिनांक : २८/०७/२०२०

## आदेश

विषय : पुणे महानगरपालिकेकडील आरोग्य विभागाकडील 'आरोग्य अधिकारी' या पदावर डॉ. नितीन बिलोलीकर, जिल्हा शल्यचिकित्सक यांना प्रतिनियुक्तीने रुजू करून घेणेबाबत.

संदर्भ :
१. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग शासन आदेश क्र. प्रतिनि२०२०/प्र.क्र.१३३/सेवा-२, दि. २३/०७/२०२०.
२. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/१९८, दि. २७/०७/२०२०.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाने संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयान्वये, डॉ. नितीन बिलोलीकर, जिल्हा शल्य चिकित्सक यांची महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ४० मधील (परिशिष्ट-२) मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदाव र तात्पुरत्या स्वरुपात प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली आहे.

डॉ. नितीन बिलोलीकर यांना दिनांक २७/०७/२०२० रोजी मध्यान्हपूर्व 'आरोग्य अधिकारी' (आरोग्य सेवा, श्रेणी-१), पुणे महानगरपालिका या पदावर रुजू करून घेण्यात येत आहे.

डॉ. नितीन बिलोलीकर यांनी डॉ. रामचंद्र हंकारे, आरोग्य अधिकारी यांचे समवेत आरोग्य विभागाकडील कामकाज करावयाचे आहे.

डॉ. नितीन बिलोलीकर यांच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार आरोग्य विभागाने वेतन व भत्ते अदा करावेत.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत : खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका.

आरोग्य अधिकारी व उप आरोग्य अधिकारी.docx